# प्रेस नोट दि. ३१/१२/२०१७

दि. २६/१२/२०१७ रोजी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन हद्दीत वाहन चोरी व इतर चोरी यांना प्रतिबंध करणेसाठी दोन टीम मध्ये मा. श्रीमती संगिता पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री. दिलीप शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली विशाल मोहीते पोलीस उप-निरीक्षक व अभिजीत चौगुल पोलीस उप-निरीक्षक याचे सोबत पोलीस हवालदार उत्तम कदम, पोलीस नाईक प्रविण भालचिम, विनायक रामाणे, वामन सावंत, पोलीस शिपाई सुभाष आव्हाड, किशोर दुशिंग, प्रितम जंगम, प्रफुल्ल मोरे, शेखर खंराडे असे दोन टिममध्ये विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये धानोरी मुंजबावस्ती भागात पेट्रोलिंग फिरत असताना १०० एकर धानोरी पुणे येथे आलो असता पोलीस उनिरीक्षक मोहीते यांचे टिमला तेथील एका घराजवळ एक इसम संशयीतपणे फिरत असलेचे दिसलेने त्यांनी दुसरे टिमशी संपर्क करुन त्यांना बोलावून घेऊन सदर भागात सापळा रचुन सायं.१८/१५ वा सदर इसमास हटकले असता तो आम्हाला पाहून पळू लागला आम्हाला त्याचा संशय आलेने आम्ही सोबतचे स्टाफचे मदतीने त्यास पाठलाग करुन सदर इसमास शिताफिने ताब्यात घेतले त्यास त्याचा नाव पत्ता व तेथे येणेचे कारण विचारले असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली व आपले नाव राहुल यमनप्पा गायकवाड वय-१९ वर्षे रा.शिर्के टेंलर्सच्या बाजुला,ताडीवाला रोड वाय बिल्डिंगजवळ बंडगार्डन पुणे असे असलेचे सांगितले. त्याने तेथे येण्याचे सबळ कारण न दिलेने आम्हास संशय आलेने आम्ही त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन येथे आणले. त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने सुमारे १५ दिवसांपूर्वी लॉक खराब असलेली एक स्प्लेंडर मोटार सायकल धानोरी आंबेडकर हायस्कूल शेजारील बिल्डींगचे घराजवळून चोरलेचे सांगितले. सदरबाबत विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि.नं. ४३१/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असलेने व त्याने सदरचा गुन्हा केलेचे कबूल केलेने सदर इसमास अटक करुन त्याचेकडे अधिक तपास करता त्याने दाखल गुन्ह्यातील व इकडील हद्दीत चोरलेली आणखी ०१ मोटार सायकल, विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीतुन चोरलेल्या ०२ मोटार सायकल आणि बंडगार्डन पोलीस स्टेशन हद्दीतुन चोरलेली ०१ मोटार सायकल त्यात ०१ स्प्लेंडर प्लस मो.सा. ०२ पॅशन प्लस मो.सा., ०१ बजाज डिस्कव्हर मो.सा. व ०१ बजाज पल्सर मो.सायकल असा एकुन ०५ गाड्या असा एकुण १,०५,००० /- रु. किंमतीचा मुद्देमाल त्याचेकडुन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. दिपक साकोरे पोलीस उप-आयुक्त सो. परि. ०४ पुणे. श्री. गणेश गावडे सहा.पोलीस आयुक्त सो. खडकी विभाग पुणे. श्रीमती. संगिता पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री. दिलीप शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली विशाल मोहीते पोलीस उप-निरीक्षक व अभिजीत चौगुल पोलीस उप-निरीक्षक याचे सोबत पोलीस हवालदार उत्तम कदम, पोलीस नाईक प्रविण भालचिम, विनायक रामाणे, वामन सावंत, पोलीस शिपाई सुभाष आव्हाड, किशोर दुशिंग, प्रितम जंगम, प्रफुल्ल मोरे, शेखर खराडे यांनी कामगिरी केली.